|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## जय देवा हनुमंता

### सत्राणें उड्डाणे

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं । करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥
गडबडिलें ब्रह्मांड धार्के त्रिभुवनीं । सुर नर निशाचर त्यां झाल्या पळणी ॥१॥

जय देव जय देव जय हनुमंता । तुमचेनि प्रसादे न भीं कृत्तांता ॥ धृ ॥

दुमदुमली पाताळें उठिला प्रतिशब्द । थरथरला धरणीधर मानीला खेद ॥
कडकडिले पर्वत उड्डुगण उच्छेद । रामी रामदासा शक्तीचा बोध ॥ जय. देव. ॥२॥

### जय देवा हनुमंता

जय देवा हनुमंता । जय अंजनी सुता ॥ ॐ नमो देवदेवा ।
राया रामाच्या दूता ॥ आरती ओवाळीन । ब्रह्मचारी पवित्रा ॥ धृ. ॥

वानररुपधारी । ज्याची अंजनी माता ॥ हिंडती वनांतरी ।
भेटी झाली रघुनाथा । धन्य तो रामभक्त । ज्याने मांडिलीं कथा ॥ १ ॥

सीतेच्या शोधासाठीं । रामें दिधली आज्ञा ॥ उल्लंघुनी समुद्रतीर ।
गेला लंकेच्या भुवना । शोधूनी अशोकवना। मुद्रा टाकिलि खुणा ॥ २ ॥

सीतेसी दंडवत । दोन्ही कर जोडून ॥ वन हे विध्वंसिलें ।
मारिला अखया दारूण ॥ परतोनी लंकेदरी । तंव केले दहन ॥ ३ ॥

निजवळें इंद्रजित । होम करीं आपण ॥
तोही त्वां विध्वंसिला लघुशंका करून । देखोनी पळताती ॥ महाभूतें दारूण ॥ ४ ॥

राम हो लक्षुमण । जरी पाताळीं नेले ॥ तयांच्या शुद्धीसाठी । जळी प्रवेशे केले ॥
अहिरावण महिरावण । क्षणामाजीं मर्दिले ॥ ५ ॥

देउनि भुभुःकार । नरलोक आटीले ॥ दीनानाथा माहेरा त्वां ॥
स्वामिसी सोडविले ॥ घेऊनि स्वामी खांदी। अयोध्येसी आणिलें ॥ ६ ॥

हनुमंत नाम तुझें । किती वर्ण दातारा ॥ अससी सर्वठायी ।
हारोहारीं अंबरा ॥ एका जनार्दनीं ॥ मुक्त झाले संसारा ॥ ७ ॥


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com